## निशाणी ०१ वरील आदेश

अर्जदार यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायद्याच्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

## अर्जदारांच्या अर्जाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाले क्र.१ ते ३ यांची आई विजयालक्ष्मी तुकाराम सावंत ह्या दि.१०/०५/२०१७ रोजी मुंबई येथे मयत झाल्या आहेत. विजयालक्ष्मी तुकाराम सावंत यांची गाव मौजे जानवली, ता.कणकवली येथे स्थावर मिळकत गट क्र.२८९६ या जमिन मिळकतीपैकी काही क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ याला संपादीत झाले आहे. सदर मिळकतीवरील तांत्रीक वाद निष्पन्न झाल्यामुळे विजयालक्ष्मी तुकाराम सावंत यांना भूसंपादीत झालेल्या क्षेत्राचा मोबदला सक्षम प्राधिकरणाने न्यायालयीन तरतुदीकरीता ओरोस येथील दिवणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर सिंधुदुर्ग यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स क्र.९६/२०१८ असे प्रकरण दाखल केले होते. सदरचे प्रकरण निकाली झाले आहे. परंतू, सदर प्रकरण न्यायालयात चालू असताना विजयालक्ष्मी तुकाराम सावंत ही मयत झाली व सदर प्रकरणी अर्जदार व सामनेवाले क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. याबाबत न्यायालयाने दि.२८/९/२०२४ रोजी नि.क्र.१ वर आदेश करुन अर्जदार यांना कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला घेऊन या असे रितसर कळवले. विजयालक्ष्मी तुकाराम सावंत यांना अर्जदार व सामनेवाले क्र.१ ते ३ यांचेशिवाय इतर कोणीही वारस नाही. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी युक्तिवाद केला की, अर्जदार व सामनेवाले क्र.१ ते ३ हेच मयत विजयालक्ष्मी तुकाराम

सावंत यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार व सामनेवाले क्र.१ ते ३ यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. न्यायालयाने अर्जदारामार्फत दैनिक वृत्तपत्र प्रहार या वर्तमान पत्रामध्ये दि.०८/०१/२०२६ रोजी जाहिर प्रगटन निशाणी क्र.१० प्रमाणे प्रसिध्द केले होते व हरकती मागवल्या होत्या. परंतु, जाहिर प्रगटन प्रसिध्द होऊन देखिल कोणीही, कोणत्याही प्रकारे, कोणतीच हरकत अर्जदाराच्या अर्जाला घेतलेली नाही.

४. अर्जदार सुनिल तुकाराम सावंत यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र.१४ प्रमाणे दिला आहे. त्यांनी पुराव्यात अर्जाशी सुसंगत अशी कथने केली आहेत. अर्जदाराच्या तोंडी पुराव्याला निशाणी क्र.१५ वरील विजयालक्ष्मी तुकाराम सावंत यांचे मृत्यू प्रमाणपत्र, निशाणी क्र.१९ वरील दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे न्यायालयातील लॅण्ड रेफरन्स क्र.९६/२०१८ या प्रकरणातील नि.क्र.१ वर झालेल्या आदेशाची सहीसुद नक्कल हा पुरक पुरावा आहे. अर्जदार यांना मयत यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे दिसून येते. सामनेवाले क्र.१ ते ३ यांनी नि.क्र.१३ वर पुरशिस दाखल करुन अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे अर्ज मंजूर करुन मिळावा असे कथन केले आहे.

५. निशाणी क्र.१० चे जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन देखिल कोणीही आजपर्यंत कोणत्याही प्रकारे अर्जदारांच्या अर्जाला कोणताच आक्षेप नोंदवलेला नाही. अर्जदार यांनी केलेला अर्ज, दिलेला पुरावा, दाखल केलेली कागदपत्रे व वरील कारणावरुन अर्जदार यांनी केलेला अर्ज सिध्द झालेला आहे. त्यामुळे, अर्जदार व सामनेवाले क्र.१ ते ३ हे

वारसप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, अर्जदार यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार व सामनेवाले क्र.१ ते ३ हे मयत विजयालक्ष्मी तुकाराम सावंत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र (लिगल हेअरशिप सर्टिफिकेट) देण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्र अपेंडीक्स–बी प्रमाणे देण्यात यावे.

४. अर्जदाराने नियमाप्रमाणे लागणारी कोर्ट फि न्यायालयात जमा करावी.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.05.06 15:05:30 +0530

(शुभम जी. लट्टुरिया)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
कणकवली.

दिनांकः०६/०५/२०२६